नि.फौ.ख.नं. २०८/२०१६

नि.६२

अभियोग पक्षातर्फे साक्षीदार क्र. ०१ यांची जबानी

मी शपथेवर साक्ष देतो की,

माझे नांव – बापु भाउसाहेब जगताप

वय – ३२ वर्षे, व्यवसाय – शेती ,

रा. मु.पो. सालेवडगांव , ता.आष्टी, जि.बीड

-----------------------------------------------

**सर तपासणी सरकारतर्फे श्री.बी एस नाकाडे वकील यांचे मार्फत–**

१. मी आरोपी क्रमांक १ ते ५ यांना ओळखतो. दिनांक १७/०५/२०१५ रोजी संध्याकाळी ५.३० ते ६ च्या दरम्यान डोके वस्ती मध्ये घटना घडली. मी त्यादिवशी माझ्या रानातुन गावामध्ये मोटार सायकलवरुन जात होतो. त्यावेळेस मला अचानक अडविण्यात आले. मला विठठल डोके आणि अर्चना नारायण डोके यांनी अडविले. विठठल याने माझ्या पाठीत लाकडाने मारले. त्यानंतर मी तिथुन गाडी सोडुन पळुन गेलो. त्यानंतर मी शिवाजी म्हतारदेव डोके यांच्या घराकडे गेलो. त्यावेळेस माझी आई म्हणजेच लहानु बाई भाउसाहेब जगतपाप मळयात होती ती मला पळताना पाहुन ती माझ्या पाठीमागे पळत आली. मी शिवाजी डोके यांचे घरासमोर पोहोचल्यानंतर तिथे लताबाई डोके यांनी आडवाआडवी केली. मी वस्ती वर गेलो होतो. तेंव्हा पाच जन आले होते. त्यांची नावे विठठल डोके, नारायण डोके, आसाराम डोके, अर्चना डोके, आणि सुंबे नावाची महीला होती. त्यांच्या हातामध्ये त्यावेळेस एक तलवार, एक कु–हाड, लाकडे आणि दगड होते. आसाराम डोके यांच्याकडे तलवार होती. नारायण डोके कडे कु–हाड होती. दगड हा सुंबे नावाच्या महीलेकडे होता. मला तल वारीने उजव्या हातावर आसाराम डोके यांनी हानले. माझ्या उजव्या हातावरुन तलवार घसरली. कु–हाड ही मला नारायण डोकेनी मारली. अर्चना डोके हीने मला काठीने पाठीत मारले. सुंबेनी हीने मला दगडाने मारहाण केली. अर्चना आणि सुंबे यांनी माझ्या आईला पाठीवर व हातावर मारहाण केली. शिवाजी म्हतारदेव डोके आणि लता डोके हे दोघे मध्ये भांडण सोडवण्यासाठी आले असता लता डोके यांच्या गळयातला हार सुंबे यांनी तोडला. शिवाजी डोके यांनी भांडणे सोडविण्याचा प्रयत्न केल ा व लताबाई व शिवाजी यांनी आमचे भांडणे सोडवले. त्यानंतर मला, माझ्या आईला, लताबाई अरुण डोके आम्हाला आष्टी येथील सरकारी दवाखान्यात माझा भाउ गौतम भाउसाहेब जगताप घेवुन आले.मी ज्यावेळेस दवाखान्यात आलो त्यावेळैस संध्याकाळचे दहा साडेदहा वाजले होते. त्यावेळी डॉक्टरांनी माझा इलाज केला. घटनेबाबत तक्रार मी अंभोरा पोलीस स्टेशन येथे दुस–या दिवशी तक्रार दाखल केली. आता मला अभिलेखावर दाखल माझी फिर्याद दाखवण्यात आली ती तीच असून त्यातील मजकूर खरा व बरोबर असून त्यावर माझी सहि आहे. फिर्यादीस **निशाणी –पी १ /पी डब्लयु १** देण्यात येत आहे.फिर्याद दिल्यानंतर मी त्याच दिवशी सरकारी दवाखाना अहमदनगर येथे माझी

आई व लता डोके यांच्या सोबत गेलो. अहमदनगर येथील सरकारी दवाखान्यात आमच्या तीघांचीही तपासणी केली. सरकारी दवाखान्यामध्ये मला सलायन लावले , गोळया औषधे दिले आणि मला माझ्या आईला व लताबाईला एका दिवसासाठी अॅडमीट केले. घटनेबाबत पोलीस पंचनामा करण्यासाठी पोलीस दिनांक १९/०५/२०१५ रोजी तीन ते साडे तीन वाजता आले. मी पोलीसांना घटनास्थळ स्वत दाखविले. त्यावेळेस पंच म्हणुन सीताराम दहातोंडे, आणि विठठल खकाळ होते. ज्या ठिकाणी घटना घडली त्या घटनेच्या पुर्वेला डोके वस्ती, पश्चीमेला डोके यांची जमीन, दक्षीणेला रस्ता, आणि उत्तरेला गावात जानारा सरकारी रस्ता आहे. पोलीस पंचनामा करण्यासाठी आले असता त्यांचा पंचनामा एक तास चालला. मला ज्या कु–हाडीने आणि तलवारीने मारहाण झाली ती दाखविल्यास मी ओळखु शकतो. आता मला ज्या तलवारीने आणि कु–हाडीने मारले ती दाखविण्यात आले. त्याचा जी एम पी नंबर १०७/२०२३ असा आहे. त्या तेच असुन त्याच कु–हाडीने आणि तलवारीने मारहाण करण्यात आली. **त्यास एम ओ १ (कु–हाड ) आणि एम ओ २ (तलवार )** देण्यात येते. आज रोजी आरोपी एक ते पाच हे कोर्टासमोर आहेत. साक्षीदाराने कोर्टासमक्ष आरोपींना ओळखले.

**सरतपास पुर्ण.**

**उलट तपास अरोपी तर्फे अॅड. एस बी म्हस्के यांचे मार्फत शपथेवर सुरु**

**२.** माझे शिक्षण १२ वी पर्यंत झालेले आहे. हे म्हणने खरे आहे की, माझे घरामध्ये माझी आई लहानु बाई , माझे वडील भाउसाहेब, आणि माझा भाउ गौतम आम्ही एवढेच जन राहतो. मी सर्वे नंबर १३७ किंवा १३८ मध्ये राहतो. हे म्हणने खरे आहे की, माझ्या वडीलांनी सर्वे नंबर १६८ मध्ये तीन एकर जमीन विकत घेतली. हे म्हणने खरे आहे की, सर्वे नंबर १६८ च्या पश्चीमेला दक्षीण उत्तर असा गाडी रस्ता आहे. तो रस्ता सालेवडगांव वरुन कडयाला जातो. हे म्हणने खरे आहे की, या गाडी रस्त्याच्या पश्चीमेला सर्वे नबर २१२ मध्ये एक हेक्टर ७२ आर आरोपींची जमीन आहे.

३. हे म्हणने खरे आहे की, आरोपीनी सर्वे नंबर २१२ मधील जमीन विलास कुलकर्णी यांच्याकडुन विकत घेतली. हे म्हणने खरे आहे की, सर्वे नंबर २१२ मध्ये आरोपीनी रस्त्याच्या कडेला जनावरांची व राहण्याची वस्ती बांधलेली आहे. हे म्हणने खरे आहे की, रस्त्याच्या कडेला पाण्याची हौद, व कांदयाची चाळ बांधलेली आहे. हे म्हणने खरे आहे की, सदरच्या जमीनीमध्ये फळबाग आहे.

हे म्हणने खरे आहे की, म्हतारदेव डोके यांनी सर्वे नंबर २१२ मध्ये आरोपीच्या जमीनीच्या उत्तरेला अडीच एकर जमीन विकत घेतली आहे. हे म्हणने खरे आहे की, सालेवडगांव ते कडा या रस्त्या वरुन गावाकडे जाताना भगवान डोके, निवत्ती डोके व रेवजी दहातोंडे यांच्या वस्ती आहेत. हे म्हणने खरे आहे की, सर्वे नंबर १६८ पासुन कडयाकडे जाना–या रस्तयावर दत्तु सोनवणे, यादव दहातोंडे, अशोक दहातोंडे, महेश दहातोंडे , बाबासाहेब डोके यांच्या वस्त्या आहेत. हे म्हणने खरे आहे की, यापुढे गेल्यानंतर अंभोरा च्या शिवारात माझ्या गावातील इतर लोकांच्या वस्त्या आहेत.

४. हे म्हणने खरे आहे की, सदरच्या रस्त्यावरुन शेतकरी हे गुरे चारण्यासाठी घेवुन जातात व संध्याकाळी त्याच रस्त्याने परत गुरे घेवुन येतात. हे म्हणने खरे आहे की, मी जी जमीन घेतली त्या जमीनीला सरकारी गाडी वाट आहे. हे म्हणने खरे आहे की, सन २०११ साली माझे वडीलांनी सदरचा सरकारी गाडी रस्ता अडविलयाने विठठल डोके आणि इतर बारा लोकांनी तहसीलदार साहेबाकडे तक्रार केली होती आणि त्या तक्रारी नुसार मंडळ अधिकारी आले होते. हे म्हणने खरे आहे की, त्यानंतर तहसीलदार साहेबांनी तो रस्ता अडवु नका म्हणुन असा आदेश केला. हे म्हणने खरे नाही की त्यानंतर मी तहसील दाराचा आदेश मिळाला तरी पण रस्ता अडवुन ठेवला होता.

५. हे म्हणने खरे नाही की दिनांक ११/११/२०१३ रोजी मी, संपत जगताप , माझे वडील भाउसाहेब, मोहन डोके, शिवाजी डोके, अजुन डोके, म्हतारदेव डोके आम्ही संगनमत करुन जेसीबी ने आरोपीची वस्ती पाडली. हे म्हणने खरे नाही की त्यानंतर आरोपी क्र १ यांनी जिल्हाधीकारी बीड यांच्या कडे वस्ती पाडले बाबतचा अर्ज दिला. हे म्हणने खरे आहे की, शिवाजी किसन डोके जिल्हा परीषद सदस्य यांचे व माझे संबंध चांगले आहेत. हे म्हणने खरे नाही की शिवाजी डोके यांच्या माझ्या सोबत असलेलया ओळखीमुळे आरोपी क्र १ याची दखल जिल्हाधीकारी बीड यांच्याकडे होवु दिली नाही.

६. नियमीत दिवाणी दावा क्रमांक ३५८/२०१४ हा दिनांक १७/०२/२०१४ रोजी

आरोपी क्र १ यानी माझ्या विरुध्द व संपत जगताप , माझे वडील भाउसाहेब, मोहन डोके, शिवाजी डोके, अजुन डोके, म्हतारदेव डोके यांच्या विरुध्द कायम मनाई हुकुमाचा दावा दाखल केला की नाही याबाबत मला काही सांगता येत नाही. मी त्या दाव्यामध्ये हजर होवुन उत्तर दिले की नाही याबाबत मला काही सांगता येणार नाही. हे म्हणने खरे आहे की आरोपी, शिवाजी डोके व म्हतारदेव् डोके यांची भावकी आहे. आरोपी, शिवाजी डोके व म्हतारदेव् डोके यांचे ब–याच वर्षापासुन आपआपसात जमते का नाही याबाबत मला काही सांगता येणार नाही.

७. हे म्हणने खरे आहे की शिवाजी डोके यांच्या पॅनल मधुन वॉर्ड मधुन माझी पत्नी पुजा उभी होती व ती पराभुत झाली. हे म्हणने खरे नाही की सर्वे नंबर २१२ मध्ये आरोपीने जमीन घेतल्याचे मला व माझ्या वडीलांना आवडलेले नाही. कुलकर्णी यांच्या जमीनी म्हतारदेव डोके आणि आरोपीने विकत घेतल्यामुळे त्यांचे आपासात जमते की नाही याबाबत मला काही सांगता येणार नाही. हे म्हणने खरे आहे की सिताराम दहातोंडे हे माझे सासरे आहेत. हे म्हणने खरे आहे की मी गावाच्या दक्षीण बाजुला राहतो व माझे सासरे गावाच्या उत्तर बाजूला राहतात.

८. हे म्हणने खरे आहे की माझ्या शेतातुन गेलेला गाडी रस्ता हा रहदारीचा आहे. हे म्हणने खरे आहे की घटना घडली त्यावेळेस सर्वे नंबर १६८ मध्ये पीक नव्हते. हे म्हणने खरे आहे की आरोपी क्र ०५ हा सन २०१७ साली मीलटरी मध्ये होता. आरोपी क्र ५ चा एक वर्षापुर्वी रिटायर झाला की नाही याबाबत मला काही सांगता येणार नाही. मीना सुंबे ही चिचोंडी पाटील येथे रहात होती. तीचे मालक केंव्हा वारले याबाबत मला काही सांगता येणार नाही. मीना सुंबे हिचे मालक पंधरा वर्षापुर्वी वारले असतील. मीन सुंबे ही तीचे मालक वारल्यानंतर अहमदनगरयेथील मिलटरी एरीया मध्ये राहण्यास गेली.

९. हे म्हणने खरे आहे की दिनांक १७/०५/२०१५ रोजी ज्या रस्त्यावर घटना घडली त्या रस्त्यावर गुरे ये जा करीत होती. मी माझ्या वस्तीवरुन सालेवडगांव गावात मोटार सायकलवरुन

घटनेच्या दिवशी जात होतो. हे म्हणने खरे नाही की माझ्या वस्तीवरुन सालेवडगांव कडे जाना–या रस्त्यावर आरोपीची जमीन नाही. विठठल आणि अर्चना ज्यावेळेस मला गाडी चालवताना आडवे झाले तेंव्हा मी पाचशे मीटर अंतर पळालो. मी डोके वस्तीवर पळत गेल्यानंतर माझी आई पाच मिनीटात आली.

१०. आरोपी क्र १ आणि शिवाजी डोके यांचे संबंध चांगले आहेत की नाही याबाबत मला काही सांगता येत नाही. आरोपी क्र १ व शिवाजी डोके हे एकमेकांच्या घरी ये जा करतात की नाही याबाबत मला काही सांगता येणार नाही. हे म्हणने खरे नाही की मी माझ्या सरतपासात सांगितल्याप्रमाणे मी शिवाजी डोके यांच्या घरासमोर गेलो आणि तिथे आरोपी क्र १ ते ५ हे आले हे मी खोटे सांगत आहे. हे म्हणने खरे नाही की माझ्या सरतपासामध्ये सांगीतल्याप्रमाणे *आसाराम डोके यांच्याकडे तलवार होती. नारायण डोके कडे कु–हाड होती. दगड हा सुंबे नावाच्या महीलेकडे होता. मला तल वारीने उजव्या हातावर आसाराम डोके यांनी हानले. माझ्या उजव्या हातावरुन तलवार घसरली. कु–हाड ही मला नारायण डोकेनी मारली. अर्चना डोके हीने मला काठीने पाठीत मारले. सुंबेनी हीने मला दगडाने मारहाण केली. अर्चना आणि सुंबे यांनी माझ्या आईला पाठीवर व हातावर मारहाण केली.* हे मी खोटे सांगत आहे.

*११.* मला आसारामनी तलवारीने मारहाण केल्यानंतर मला रक्ताची जखम झाली. त्यावेळी माझा शर्ट फाटला आणि तो रक्ताने भिजला. मला नारायण ने कु–हाड ही धारी कडुन मारली. त्यावेळी माझ्या पाठीवर रक्ताची जखम झाली. अर्चना ने मला पाठीवर काठीने पाच सहा वेळा मारले. पाठीवर काठीने मारल्याने वळ उमटले होते. मला दगड हा उजव्या पायाच्या मांडीवर लागला होता. त्यामुळे माझा उजवा पाय सुजला होता. सदरच्या जखमा हया मी आष्टीला डॉक्टरकडे गेल्यानंतर दाखविले होते.

१२. हे म्हणने खरे आहे की माझ्या गावापासुन अंभोरा पोलीस स्टेशन हे तीन कीलोमीटर

अंतरावर आहे. मार लागलयानंतर मी अंभोरा पोलीस स्टेशन ला गेलो का नाही हे मला आठवत नाही. हे म्हणने खरे आहे की घटना घडलयानंतर मी थेट दवाखान्यात गेलो. मी मार लागल्यानंतर पोलीसांची मदत याच्या मुळे घेतली नाही की मला दगड , तलवार आणि कु–हाड लागलयानंतर मी थेट दवाखान्यात आलो. हे म्हणन खरे आहे की माझ्या गावापासुन सहा किलोमीटर अंतरावर सुलेमान देवळा प्राथमीक रुग्नालय आहे. मी घटना घडल्यानंतर सर्वप्रथम सुलेमान देवळा येथे प्राथमिक रुग्नालयात गेलो होतो. हे म्हणने खरे आहे की सुलेमान देवळा नंतर कडयाच्या प्राथमीक रुग्नालयात गेलो नाही मी सरळ आष्टी येथील रुग्नालयात आलो.

१३. हे म्हणने खरे आहे की घटना घउल्यानंतर मी स्वतहुन ग्रामीण रुग्नालय आष्टी येथे गेला. हे म्हणने खरे आहे कीत्यावेळी माझ्या सोबत लताबाई व लहाना बाई होतया. हे म्हणने खरे आहे की लताबाईला पाठीवर दगडाचा मार होता आणि लहानु बाईला काठीचा व दगडाचा मार होता. हे म्हणने खरे आहे की घटना घउल्यानंतर आम्ही आष्टी येथील दवाखानयात गेल्यानंतर डॉक्टारांनी आम्हाला तपासले आणि गोळया औषधे घेवुन आम्हाला परत पाठवुन दिले.

१४. मी बेशुध्द झाल्यानंतर इतर लोकाना कोणी मारहाण केली याबाबत मला काही सांगत येणार नाही. भांडण्याच्या अगोदर मी लताबाईच्या गळयातील डोरले पाहिले होते. त्या डोरलया मध्ये काळे मनी किती, सोन्याचे मनी किती ग्रॅम चे डोरले होते ते मी सांगु शकत नाही. लताबाइ चे डोरले हे सुंबे बाई यांनी घेवुन गेले का नाही याबाबत मला काही सांगता येणार नाही. हे म्हणने खरे नाही की दिनांक १७/०५/२०१५ रोजी सायंकाळी सहा वाजण्याच्या सुमारास मी मोटार सायकलवरुन चालला नव्हतो आणि विठठल आणि अर्चनाने मला अडविले नाही.

१५. हे म्हणने खरे नाही की मी माझ्या सरतपासात सांगितलेला संपुर्ण मजकुर हा खोटा आहे. हे म्हणने खरे नाही की लताबाई ही भांडणे सोडविण्यासाठी आली हे मी खोटे सांगत आहे. हे म्हणने खरे आहे की शिवाजी डोके आणि लताबाई यांच्या वस्तीवर घटनेच्या दिवशी पंधरा ते वीस लोक होते.

घटनेच्या वेळेस इतर लोक भांडणे सोडविण्यासाठी आले नाही त्यावेळेस फक्त शिवाजी डोके हे भांडणे सोडविण्यासाठी आले होते. रस्त्याने येणारे जानारे लोक भांडणे सोडविण्यासाठी आले नव्हते. रस्त्याच्या ठिकाणी असनारे वस्तीवरील लोक देखील भांडणे सोडविण्यासाठी आले नाहीत. भांडण हे साधारण अर्धा तास चालले.

१६. वस्तीवरील इतर लोकांचे व माझे काही वाकडे नाही. हे म्हणने खरे नाही की मी सरकारी रस्ता अडविल्यामुळे आरोपीने माझ्या विरुध्द तहसील दार यांचे कडे तक्रार केली आणि त्यांनी माझ्या विरुध्द दिवाणी दावा दाखल केला या सर्वांना शह देण्यासाठी सदरची खोटी तक्रार आरोपीविरुध्द दिनांक १८/०५/२०१५ रोजी अंभोरा पोलीस स्टेशन येथे दाखल केली. घटना घडल्यावर पोलीस हे माझ्याकडे आले होते का नाही याबददल मला सांगता येणार नाही. मी स्वतहुन सांगतो की मी त्यावेळी जखमी होतो त्यामुळे मला काही आठवत नाही. दिनांक १८/०५/२०१५ रोजी मी अंभोरा पोलीस स्टेशनला गेलो होतो त्यावेळी मी शुध्दीवर होतो. हे म्हणने खरे नाही की मी आरोपींना त्रास देण्यासाठी आज रोजी खोटा जबाब देत आहे. हे म्हणने खरे नाही की पोलीस माझ्या कडे पंचनाम्यासाठी आले हे मी खोटे सांगत आहे. हे म्हणने खरे नाही की शिवाजी किसन डोके हे जिल्हा परीषद सदस्य यांचा राजकीय वजन वापरुन मी अंभोरा पोलीस स्टेशन शी संगनमत करुन आरोपी विरुध्द खोटे दोषारोप पत्र दाखल केले. हे म्हणने खरे नाही की मी आज रोजी खोटी साक्ष देत आहे.

**उलटतपास पुर्ण.**

**फेरतपास नाही.**

श्रवणोत्तर स्वीकृत,

( एस.व्ही.उतकर )

दि.१३-१२-२०२३ प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी, आष्टी.